
विमुक्त जाती सेवा समिती वसंतनगर संचलित...
ग्रामीण (कला,वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय
वसंतनगर ता.मुखेड जि.नांदेड
माजी विद्यायार्थी संघटना आयोजित
माजी विद्यार्थी मेळावा
या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय वेबीनार.
* अध्यक्ष *
मा.प्रो.डॉ.हरिदास राठोड
प्राचार्य
ग्रामीण (कला,वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय वसंतनगर,मुखेड
* मार्गदर्शक *
मा.अनंक राऊत
कवि,गझलकार
व्याळा,ता.बाळापूर जि.अकोला
प्रा.संजय पाटील प्रमुख : माजी विद्यार्थी संघटना
प्रा.देविदास पवार डॉ.सखाराम गोरे प्रा.गंगाधर मठपती
सदस्य : माजी विद्यार्थी संघटना
https://meet.google.com/pmr-ihog-xkc
मंगळवार दि.२९ जून २०२१ सायंकाळ ६ :०० वाजता.

लोकमत

## …रात पाऊस

…परिसरात २७
…ी ७ च्या दरम्यान
…टासह एक तास
…झाला. त्यामुळे
…ान व्यक्त होत
…व खत मात्रा
…न चांगला आहे.

## शाहू महाराज जयंती

**हदगाव :** कंजारा येथील ओमचंद्र वाचनालयात शाहू महाराज जयंती साजरी झाली. यावेळी सरपंच प्रदीप पाटील, सचिन कदम, वाचनालयाचे सचिव प्रा. चंद्रकांत तगडपल्ले, शिवाजीराव तवर, अध्यक्ष प्रल्हादराव तगडपल्ले आदी होते.

## माजी विद्यार्थी मेळावा

**मुखेड :** वसंतनगर येथील ग्रामीण महाविद्यालयाच्यावतीने २९ रोजी सायंकाळी ७ वाजता माजी विद्यार्थ्यांचा ऑनलाईन मेळावा होणार आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य हरिदास राठोड तर मार्गदर्शक म्हणून अनंत राऊत राहणार आहेत.

दै.द.सोमेश्वर साथी | गुरुव…

# संकटांना आत्मविश्वासाने सामोरे जा -कवी अनंत राऊत



मुखेड - कवी हा वरचा समाज शिवताना आतून फाटत असतो. महाविद्यालयीन जीवन सर्वाथनि आनंद लुटण्याचे जीवन आहे पण हा आनंद लुटताना वडिलांच्या घामाळलेल्या हाताची जाणीव राहू द्या ते विसरू नका. आजचे युवक धर्मांधतेत अडकले आहेत. युवकांनी सामाजिक चळवळीत सक्रिय राहिले पाहिजे.मानवता हाच खरा धर्म आहे. आपण नशिबाला शून्य टक्के किंमत दिली पाहिजे. आयुष्याच्या बाजारात आत्मविश्वास कुठे विकत मिळत नाही. आत्मविश्वास हाच यशाचे गमक आहे. जपानसारख्या देशात अगोदर स्वप्न ठरवुन जीवन जगतात. कशात करिअर करायचे ते ठरवा, टेन्शन घेऊ नका,मैत्री ही जीवनात अनमोल आहे. पहिले मित्र हे आपले आई-वडील असतात. मित्र जोडण्यासाठी अहंकार सोडला पाहिजे.वणव्यातल्या गारव्या सारखे मित्र शोधत बसू नका तर तुम्हीच गारवा व्हा. या व अश्या आशयाच्या अनेक कविता, गझल, चारोळी त्यांनी समर्पकपणे सादर करून श्रोत्यांची मने जिंकली. संकटांना आत्मविश्वासाने सामोरे जा असे प्रतिपादन अकोला येथील प्रसिद्ध कवी गझलकार अनंत राऊत यांनी ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय वसंतनगर ता. मुखेड जी. नांदेड येथील माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने आयोजित माजी विद्यार्थी मेळावा प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना केले.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास राठोड म्हणाले की महाविद्यालयाची आठवण झाली की विद्यार्थ्यांना वर्ग, शिक्षक, मित्र आठवतात.चांगल्या शिक्षकांची आठवण विद्यार्थी हे नेहमी काढत असतात. आमच्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी हे सर्वच क्षेत्रात आहेत. संस्थेचे अध्यक्ष कर्मवीर किशनराव राठोड, संस्थापक सचिव कै. गोविंदराव राठोड,विद्यमान सचिव प्राचार्य गंगाधर राठोड, विद्यमान आमदार डॉ.तुषार राठोड, सहसचिव गोवर्धन पवार, मुख्याध्यापक संग्राम मस्कले यांनी संस्था चालवताना जी ध्येयधोरणे डोळ्यासमोर ठेवून काम केले तेच पुढे चालविण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत.महाविद्यालयाच्या नॅकच्या दोन सायकल पूर्ण झाल्या असून महाविद्यालयास आय.एस.ओ. मानांकन प्राप्त आहे.माजी विद्यार्थी ही महाविद्यालयासाठी योगदान देत आहेत.आणखीन हे योगदान वाढणे अपेक्षित आहे.एक चांगला कार्यक्रम माजी विद्यार्थी संघटनेकडुन घेण्यात आल्या बद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे संगणक विभाग प्रमुख तथा प्रस्तुत संघटनेचे प्रमुख प्रा.संजय पाटील यांनी करून कार्यक्रम आयोजना पाठीमागची भूमिका विशद केली.

सूत्रसंचलन माजी विद्यार्थी तथा विद्यानिकेतन पब्लिक स्कूल कमळेवाडी येथे कार्यरत मराठी विषयाचे अध्यापक चंद्रकांत गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. संजय पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजन समितीतील प्रा. देविदास पवार,प्रा. डॉ. सखाराम गोरे,प्रा गंगाधर मठपती यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास गुगल मीट व यूट्यूबच्या माध्यमातून माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक ही उपस्थित होते.


meet.google.com/yha-ovyc-zqk?authuser=0
Sharing this tab to streamyard.com
Stop
Anant Raut
You
7 PM | yha-ovyc-zqk
54


meet.google.com/yha-ovyc-zqk?authuser=0
Sharing this tab to streamyard.com
Stop
चंद्रकांत गायकवाड
Govind Pande
Sakharam Gore
ajit shingarputle
Imran Shaikh
S.pandit shinde
Haridas Rathod
You
Anant Raut
8 PM | yha-ovyc-zqk
53


9:19
48.0 KB/S
71
Powered by
StreamYard
Alumni Association Meet 2020-21
178 views · Streamed 3 days ago
27
0
Share
Download
Save
Sanjay Patil
186 subscribers
SUBSCRIBE
Up next
Autoplay
The Two Sisters p. no. 2
Sanjay Patil
34 views · 4 months ago
Watch videos on your TV
Select videos on your phone.
Watch them on TV.
NO THANKS
WATCH ON TV